# अनामिकाची विचारधून

पुस्तकात डोकावताना

**भारतीय प्रशासकीय सेवेतले ज्येष्ठ अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी लिहिलेली आगळीवेगळी कादंबरी – 'अनामिकाची विचारधून' सदामंगल पब्लिकेशन लवकरच प्रकाशित करत आहे. त्यातील प्रकरण १५ खास 'अंतरीचे प्रतिबिंब'च्या वाचकांसाठी.**




डॉ. किरण कुलकर्णी

9403078751


प्रॉडक्टव्यक्तीचा चतुष्पाद फाटकाकडे आळसावलेल्या नजरेने बघत असतानाच फाटक उघडून ते तिघे जण आत आले. त्यातला एक खूपच उंचाड्या होता आणि दोघे साधारण उंचीचे. साधारण उंचीवाल्या एकाचे डोळे लाल दिसत होते, तर दुसऱ्याने चौकड्याचा शर्ट घातला होता. कर्तव्यावरील पहारेकऱ्याप्रमाणे चतुष्पादाने आरोळी ठोकली आणि तातडीने त्या तिघांकडे धाव घेतली. त्यामुळे तिघे जरा बिचकून थबकले. आपल्या घ्राणेंद्रियाने चतुष्पादाने तिघांचा अंदाज घेतला. त्याला तिघांपैकी एकाचाही गंध आवडला नाही. तुमच्यापैकी एकाचाही गंध मला आवडलेला नाही, हे चतुष्पाद त्याच्या भाषेत मोठ्याने सांगू लागला. घरात आराम करत असलेल्या माझ्या मित्रधन्याला भेटूच नका, असेही त्याने त्या तिघांना सुचवले. त्यांना ते कळत नाही असे वाटून जरा मोठ्याने पुनःपुन्हा तो सांगत राहिला.

चतुष्पादाचा आरडाओरडा ऐकून प्रॉडक्टव्यक्ती घराच्या दारात आला आणि उलट त्याने चतुष्पादालाच गप्प राहण्यास फर्मावले. बिचारा चतुष्पाद प्रॉडक्टव्यक्तीकडे येऊन ज्यांचा गंध मला आवडलेला नाही, त्यांच्याशी तू कशाला बोलतोस, असे कुरकुरत राहिला. चौकड्या फाटकापाशीच थांबला. उंचाड्या आणि लालडोळ्या मात्र प्रॉडक्टव्यक्तीशी बोलत थेट घरात गेले. मग चतुष्पादाचा नाइलाज झाला. आता आपण चौकड्यावर लक्ष ठेवून दारापाशीच बसावे, असा विचार करून अंग थोडेसे सैलावून चतुष्पाद बसून राहिला. अधूनमधून चौकड्याकडे बघून आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी तोंडावाटे बारीक आवाज काढणे त्याने चालूच ठेवले.

काही वेळातच प्रॉडक्टव्यक्ती तयार होऊन उंचाड्या आणि लालडोळ्याबरोबर घराबाहेर आला आणि चतुष्पादाच्या डोक्यावर घाईघाईने हात ठेवून फाटकाबाहेर पडलादेखील! हे काही चतुष्पादाला आवडले नाही. आपल्या मित्रधन्याने आपल्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही आणि कुठे चालला, का चालला ह्याचा उच्चारही न करता निघून गेला, ह्याचा चतुष्पादाला रागच आला. ते सगळे तिथून निघून गेल्यावरसुद्धा काही काळ त्याचा संताप कायम राहिला. ऋणानुबंध असल्याने मित्रधन्यावरचा त्याचा राग फारसा टिकला नाही. उंचाड्या आणि लालडोळ्या परत दिसू तर दे, त्यांना भुंकून बेजार करायचे, असे त्याने मनोमन ठरवले. खरे तर असल्या विचित्र गंध असलेल्या लोकांना मित्रधन्याने एंटरटेन केले की दर वेळेसच असे व्हायचे. मग नंतर कधी तरी मित्रधनी आपल्या चतुष्पादाला समजावून सांगायचा, तेव्हा कुठे शांती व्हायची.

त्या दोघांबरोबर मित्रधनी बाहेर पडताना जे बोलत होता आणि ते दोघे जे बोलत होते ते काळजीपूर्वक ऐकण्याचा चतुष्पादाने प्रयत्न केला. त्यातून प्रक्षोभक किंवा अडचणीचे कुणाचे टोन्स तर नाहीत ना, हे त्याने तपासून पाहिले. तसे ते नव्हते हे जाणवून तो थोडासा स्वस्थ झाला. ३६० डिग्री विशेष यंत्र, असले काही शब्द त्याने नव्यानेच ऐकले. त्याच्या शब्दसंग्रहात हे शब्द नसल्याने अर्थ कळला नाही. उच्चार आणि

टोन अडचणीचा नव्हता, याचे त्याला त्यातल्या त्यात बरे वाटले.

ते चौघे फाटकाबाहेर पडल्यावर मित्रधन्यावरचा आपला टेम्परी राग घालवण्यासाठी पाळीव चतुष्पादाने बराच वेळ सारे अंग हलवत कान खाजवला आणि फाटकाजवळच मुटकुळे करून तळ ठोकला. रस्त्यावरचे काही आवाज आणि कुठे खुट्ट झाले तर कान उभारायचे आणि मान थोडी उचलून घ्राणेंद्रिय फुरफुरायचे एवढे सोडले तर बाकी फारशी हालचाल करायची नाही, असे त्याने ठरवले.

घडल्या गोष्टींचा विचार त्याच्या मनातून जाईना. खरे तर मित्रधनी अनेकदा असे त्याला काही न सांगता घराबाहेर पडला होता. ही काही तशी पहिलीच वेळ नव्हती. तरीही ह्या वेळेस त्याला वाटली तशी हुरहुर कधी वाटली नव्हती. आलेल्या तीन द्विपादांबद्दल आपल्याला काय वाटले, ह्याचे त्याच्या इवल्याशा मेंदूने पुन्हा एकदा स्कॅनिंग सुरू केले.

त्या तिघांपैकी चौकड्याचा विचारगंध फारसा आपल्या विचारात घ्यावा, असे त्याला वाटले नाही. लालडोळ्या आणि उंचाड्या मात्र विचित्र विचारगंध पसरवत होते, असे त्याला पुन्हा एकदा जाणवले. त्या दोघांबरोबर आपणही घरात जायला हवे होते असे त्याला वाटून गेले. मित्रधन्याने त्यांच्याबरोबर घरात यायला त्याला प्रतिबंध केला, हेही त्याला आठवले. मित्रधन्याने आपल्याबाबत घेतलेला निर्णय योग्यच असणार, असा विचार दर्शवणारी शेपटीची हालचाल करून पुन्हा तो थोडा स्वस्थ झाला.

उंचाड्या आणि लालडोळ्याचा विचारगंध विचित्र होता आणि असा विचित्र विचारगंध पूर्वी कधीच आपण अनुभवलेला नव्हता, हे त्याला जाणवत राहिले. असल्या लोकांबरोबर जाऊ नकोस, हे आपण मित्रधन्याला सुचवले की नाही, हे त्याला आठवेना. आपण जरा जोरात तसे सुचवले असते आणि आपला निषेध मोठ्याने भुंकून मांडला असता, तर कदाचित मित्रधन्याने आपले ऐकले असते हे वाटून तो जरा अपराधी झाला. अर्धवेटोळ्या शेपटीची दिशा किंचित बदलून त्याने स्वतःचा अपराधीपणा स्वतःशी कबूल केला. हा अपराधीपणा त्याने अंगणातल्या झाडांच्या पडणाऱ्या पानांना आणि घराच्या कम्पाऊंडवर बागडणाऱ्या खारुताईला सांगितला नाही. त्याला निरुत्साही वाटू लागले. त्यामुळे अंगणातल्या वेलीवर फुललेल्या नवीन फुलांकडे आणि मित्रधन्याने ठेवलेल्या भांड्यातले पाणी प्यायला आलेल्या दोन चिऊताईंकडेही त्याने लक्ष दिले नाही.

पाणी प्यायला आलेल्या दोन्ही चिऊताईंना जरा आश्चर्यच वाटले, नेहमीसारखा चतुष्पाद आपल्यावर धावून शिवणापाणी खेळत नाही, हे त्या दोघींनाही जाणवले. चिवचिवत एकमेकींना त्यांनी ते बोलून दाखवले. अगदी घराच्या बंद दारानेही ह्या वेगळेपणाची नोंद घेतली. ह्यावर कम्पाऊंडने टाकलेला सुस्कारा मात्र कोणी ऐकला नाही. त्या छोट्या विश्वातले सगळेच सजीव-निर्जीव आपल्या खेळकर नायकाच्या अपराधी भावनेत न सांगता सामील झाले; हिरमुसले झाले.

त्या छोट्या विश्वातल्या साऱ्या सजीव आणि निर्जीवांची रया गेल्यासारखी झाली. खारुताई एकाच जागी जणू पुतळा होऊन बसली. चिऊताईंचा चिवचिवाट थांबला. आपण निर्जीव आहोत, हे कम्पाऊंड पुन्हा पुन्हा सिद्ध करू लागले. घराच्या बंद दाराने स्वतःला आकसून घेतले आणि स्वतःचे विशेषण छोट्या विश्वभर पोहोचवले. छोट्या विश्वाच्या नायकाचा अपराधी भाव जणू सगळीकडे भरून राहिला.

मित्रधनी परत कधी येतो, याची वाट पाहात ते मुटकुळे फाटकापाशी गुपचूप पडून राहिले.

***

सुसज्ज इमारतीतल्या अनेक वैद्यकीय उपकरणे आणि यंत्रांनी भरलेल्या निर्जंतुक आणि अतिस्वच्छ खोलीत प्रॉडक्टव्यक्तीला झोपवण्यात आले होते. लालडोळ्या बाहेरच होता; पण उंचाड्या मात्र वैद्यकीय गणवेशात खोलीमध्ये उपस्थित होता. इतर दोन-चार जण मदतीला होते. खोलीच्या आकाराच्या मानाने अजस्र वाटणाऱ्या यंत्राच्या वर्तुळाकार भागात प्रॉडक्टव्यक्तीचे डोके ॲडजस्ट केल्यावर उंचाड्याने थोडे आश्वासक बोलून प्रॉडक्टव्यक्तीला डोळे बंद करण्यास सांगितले. थोड्या वेळापूर्वी दिलेल्या औषधाचा परिणाम सुरू होत असल्याने जड होत जाणारे डोळे बंद करायला सांगितले, ह्याचे प्रॉडक्टव्यक्तीला बरेच वाटले. अंग सैलावून आपल्या मेंदूचे ३६० डिग्री स्कॅनिंग करून घेण्यासाठी प्रॉडक्टव्यक्ती स्वतःच्या विचारविश्वामध्ये शिरला.

प्रॉडक्टव्यक्तीने डोळे उघडले तेव्हा भोवतीच्या सुंदर प्रकाशात खुल्या आकाशाखाली विस्तीर्ण हिरव्या मैदानात आपण पहुडले आहोत, असे त्याच्या लक्षात आले. सळसळणाऱ्या उत्साहाने तो उठून बसला. जवळची एक टेकडी प्रसन्न हिरवाईने नटलेली! दूरवर पसरलेल्या डोंगररांगा आणि चोहीकडे पाचूरंगाची नवलाई! आपण ज्या मैदानात आहोत, ती एका टेकडीवरची सपाटी आहे, असे त्याच्या लक्षात आले. उंचावरून चहूबाजूंचे पाहण्याची स्वाभाविक मानवी उत्सुकता बळावल्यामुळे तो चालत निघाला. अंतर जास्त वाटत होते. प्रत्यक्षात तो क्षणात टेकडीच्या काठावर आला आणि दूरवर नजर फेकू शकला.

(पान ११९ वर)...

... (पान ३८ वरून)

एक टुमदार गाव टेकडीच्या पायथ्याशी वसलेले होते. गावातली शाळेची सुबक इमारत आणि प्रांगण उंचावरूनही डोळ्यात भरत होते. गावाशेजारचा जलाशय, पाण्याची टाकी, एकच मधला मुख्य रस्ता आणि त्याच्या वेड्यावाकड्या गल्ल्या! गावात गजबज कशी नाही आणि शाळेच्या प्रांगणात मुले कशी नाहीत, असा विचार त्याच्या मनात येताच अचानक त्याला गजबज दिसू लागली आणि खेळती मुलेही दिसली. न राहवून तो गावाच्या दिशेने टेकडी उतरू लागला. उतार तसा फार तीव्र नव्हता आणि अंधूकशी का होईना पायवाट होती, खाचखळगे होते – नाही असे नाही, ते विशेष जाणवण्याजोगे नव्हते.

गावाकडे जाणाऱ्या वाटेत दगडधोंडे, झाडीबरोबरच वळणावळणांवर माणसेही भेटली. हाती काठी घेतलेल्या आणि गोल कड्याचा चष्मा घातलेल्या एका तुळतुळीत डोक्याच्या माणसाने 'हिकडून जावा,' असे आवर्जून सांगितले. भरगच्च दाढीवाले दोघे जण बोलले काहीच नाहीत; पण मैत्रिपूर्ण कटाक्षाचे आदानप्रदान झाले. भरगच्च दाढीवाले एकमेकांशी बोलण्यात पुन्हा दंग झाले. 'उत्क्रांती' आणि 'वर्गकलह' एवढे शब्द मात्र ऐकू आले. कोट घातलेल्या एकाने तर टेकडी उतरल्यावर गावाकडे जायचा हमरस्ताच दाखवला.

गावाच्या सुरुवातीलाच एका मोकळ्याढाकळ्या अंगणातल्या स्ट्रक्चरने त्याचे लक्ष वेधून घेतले. ते चक्क पुस्तकांचे घर होते. म्हणजे, भिंती पुस्तकांच्या, छप्पर पुस्तकांचे आणि कुंपणही पुस्तकांचे. कुठेही जावे, तिथले पुस्तक काढावे, वाचावे आणि परत जागेवर ठेवून द्यावे. पुढून एकमजली दिसणारे ते घर मागच्या बाजूला उंच, उंच आणि विस्तीर्ण होत गेलेले! प्रॉडक्टव्यक्तीला त्या घराची उंची बाजूच्या टेकडीपेक्षाही जास्त आहे, असे तिथे उभे राहून जाणवले. असेच येथे या घरात रमावे आणि येथेच राहावे असे त्याला वाटून गेले. आधी गाव पाहून परत येऊ, असे त्याने ठरवले.

पुढे गेल्यावर तर त्याला आक्रीतच दृष्टीस पडले. 'पंचायत' असे लिहिलेल्या त्या स्ट्रक्चरला उंची होती; पण भिंतीच नव्हत्या. जमिनीपासून काहीशा उंचावर बांधलेल्या त्या स्ट्रक्चरला चार खांबांनी तोलून धरले होते आणि आक्रीत म्हणजे ते खांब नव्हतेच मुळी! माणसे होती. टेकडीच्या पायथ्याशी गावाकडे जाणारा हमरस्ता दाखवणारा कोटवाला कुठून तरी तिथे आला आणि एका खांबाला उद्देशून म्हणाला, ''माध्यमकर्मींनो, इतर तीन खांबांपेक्षा तुमची उंची कमी पडते आहे. त्यामुळे स्ट्रक्चर कलते आहे, हे योग्य नाही. तुमची उंची वाढवा आणि बॅलन्स करा.''

काहीशा उंचीवरच्या त्या बिनभिंतीच्या स्ट्रक्चरमध्ये जाण्यासाठीच्या पायऱ्या मात्र अजिबात सुबक नव्हत्या – ओबडधोबड होत्या आणि त्यांना कठडा नव्हताच. तोल सांभाळू न शकणाऱ्याची तर गच्छंतीच होईल.

गावकरी मात्र आपापल्या व्यवसायात, कामात गर्क दिसले. आपण त्यांना बहुतेक दिसतच नाही आहोत म्हणून त्यांचे लक्ष नाही की काय, असे प्रॉडक्टव्यक्तीला वाटले. टेकडीवरून उतरताना रस्ता दाखवणाऱ्यांना मात्र आपण दिसलो, मग येथे कसे काय पारदर्शक झालो, असा त्याला प्रश्न पडला.

त्याचे पाय त्याला शाळेकडे घेऊन जाणारच होते, त्यामुळे तो शाळेपाशी पोहोचलाच. पाहतो तो काय? एकाही मुलाचा पत्ता नाही. शाळा जणू स्तब्ध! तेवढ्यात त्याला शाळेच्या फाटकापाशी मघाचा काठीवाला गोल कड्याचा चष्मा घातलेल्या तुळतुळीत डोक्याचा माणूस दिसला. तोंडाचे बोळके दाखवून हसला खरा; पण पाठ फिरवून भलत्याच दिशेला चालायला लागला.

प्रॉडक्टव्यक्तीला जरा ते विचित्रच वाटले. शाळेचे फाटक उघडून आत जावे की काय, असा तो विचार करत असतानाच सुरुवातीपासून असलेला प्रसन्न प्रकाश मंदावल्यासारखा त्याला जाणवला. कुबट दर्प आला. वाहता वारा थांबला आहे आणि कुबट दर्प कुठून येतो आहे म्हणून त्याने आसपास पाहिले, तर सारे कसे स्तब्ध! गावाची गजबज निमालेली. गावात निर्जीवांचे राज्य!

अचानक त्याचे लक्ष जवळच्या टेकडीच्या माथ्याकडे गेले. तिथूनच उतरून तो गावाकडे आला होता. टेकडीच्या माथ्यावर घाणेरड्या पिवळ्या रंगाचा द्रव जमतो आहे आणि तो वेगाने वाढतोही आहे. त्याचा लोंढा तयार होऊन गावाच्या दिशेने घरंगळू लागला. नाही, हा लाव्हा नाही. त्या द्रवाचा विषारी थंडपणा इतक्या लांबून जाणवतो आहे. हा कुबट दर्प त्याचाच! जास्त प्रवाही नसल्याने हळूहळू, निश्चितपणे गावाच्या दिशेने तो द्रव वाहू लागलाय. कणाकणाने पुढे येत आहे. पाहा, त्याने टेकडी काबीज केली. त्या द्रवाचे प्रतिबिंब आकाशभर पसरू लागले. इतक्या लांबून त्याचं लिबलिबीत अस्तित्व जाणवत आहे. हे काही तरी वेगळेच आहे.

भीती स्पर्शून गेलीच. लिबलिबीत अर्धप्रवाही घाणेरड्या कुबट दर्पाचा हा पिवळट लोंढा क्षणोक्षणी वाढत आहे. टेकडी गिळंकृत करून आता गाव गिळायला ठामपणे येत आहे.

निघावे इथून, पळावे येथून. ह्या द्रवापासून दूर जायलाच हवे. त्याचा वेग कमी आहे. दूर जाऊ शकतो आपण!

प्रॉडक्टव्यक्तीने गावाबाहेर उलट दिशेने भरभर चालायला सुरुवात केली.

मध्येच मागे वळून पाहातो, तो काय? ते लिबलिबीत अस्तित्व आता महाकाय झाले होते आणि गावातला पहिला घास घेत होते पुस्तकांच्या घराचा! एखाद्या हिंस्र, बळकट जनावराने सहजी आपले भक्ष्य गिळावे तसे पुस्तकांचे घर क्रमाक्रमाने त्या लिबलिबीत अस्तित्वामध्ये गडप होत होते. त्याचे आकारमान वाढायचे मुळी थांबतच नव्हते. अजस्र, महाकाय, अवाढव्य ह्या सगळ्याच्या पलीकडचे ते आकारमान गावाच्या रस्त्यातून, गल्ल्यातून, घरातून, घरांवरच्या छपरावरून पुढे पुढे सरकत होते.

आता मात्र प्रॉडक्टव्यक्ती भराभर चालण्याऐवजी पळू लागला. ''जितके लांब लवकर जाता येईल तेवढे जाऊ या! येस. समोरच्या दुसऱ्या टेकडीवर चढूयात. उंचावर सुरक्षित! अरे, हे काय? त्याही टेकडीच्या माथ्यावर पिवळट द्रव गोळा होताना दिसतोय. पाहा, क्षणार्धात त्याचे आकारमान वाढले. आणखी आकारमान वाढतेय, घरंगळतंय... आपल्याच दिशेने.''

प्रॉडक्टव्यक्तीने पुन्हा दिशा बदलली. पळण्याचा वेग वाढवला; पण समोर पाहिले तो काय? तोच लिबलिबीत द्रव. आक्रमकतेने नाही तर शांतपणे त्याच्या दिशेने येणारा, कॉन्फिडन्ट!


आता मात्र प्रॉडक्टव्यक्तीला काय करावे ते कळेना! सगळ्या दिशांनी इंचाइंचाने पुढे येणारा तो कॉन्फिडन्ट द्रव, त्याचा विषारी थंडपणा, घाणेरडा पिवळा रंग आणि तो कुबट दर्प.

प्रॉडक्टव्यक्तीने सुटकेच्या अपेक्षेने आजूबाजूला पाहिले. तेवढ्यात आकाशातून आपल्या अंगावर थेंब पडत आहेत, असे त्याच्या लक्षात आले. त्याने आपल्या खांद्यावर पडलेला थेंब पाहिला तोच द्रव. विषारी थंडगार.

थेंबांमागून थेंब पडत गेले. डोक्यावर, कानावर, पाठीवर– साऱ्या अंगावर, अर्धप्रवाही चिकट! हातावरच्या उघड्या कातडीला त्याचा प्रथम स्पर्श झाला. थंडगार स्पर्श – कॉन्फिडन्ट!

चिकट द्रवाच्या पावसापासून वाचण्यासाठी त्याने जवळच असलेल्या झाडाचा आश्रय घ्यायचे ठरवले. दोनचार ढांगांत तो झाडाखाली पोहोचलादेखील! झाडाखाली पोहोचूनसुद्धा अंगावर थेंब पडतच राहिले, म्हणून त्याने चमकून वर पाहिले. झाडाच्या पाना–पानांतून तोच चिकट द्रव गच्च भरलेला! जणू त्या द्रवाची निर्मिती झाडाच्या पानांमध्येच होत होती.

आता जावे तर कुठे जावे?



चहूबाजूंनी त्याच्याकडे झेपावणारं ते लिबलिबीत अस्तित्व, कुंद आभाळातून पडणारे चिकट अर्धप्रवाही थेंब. द्रवाचे आकारमान वाढत चालले. प्रॉडक्टव्यक्तीने घट्ट डोळे मिटून घेतले. लिबलिबीत अस्तित्व त्याला चहूबाजूंनी भिडले. नखशिखान्त बुडाला.

तो नकोसा थंडगार चिकट स्पर्श सर्वांगाला.

ती टेकडी, ती पाचूरंगाची हिरवाई, उताराकडची पायवाट, पुस्तकांचे घर, बिनभिंतीची नगर पंचायत, शाळा – सगळे सगळे त्या लिबलिबीत अस्तित्वामध्ये गडप, अगदी प्रॉडक्टव्यक्तीसुद्धा!!

***

प्रॉडक्टव्यक्तीने डोळे उघडले, तेव्हा तो सुसज्ज इमारतीतल्या एका टिपटॉप बेडवर होता. उंचाड्या आणि बाकी सगळे भोवती होतेच. थकल्यासारखे वाटल्याने प्रॉडक्टव्यक्तीने पुन्हा डोळे मिटले. ग्लानी आलेली थोडा वेळच टिकली. एनर्जी औषधांनी त्याच्या शरीरात पेशीपेशींना ऊर्जा दिली आणि चलनवलनासाठी प्रोत्साहित केले. उंचाड्याने त्याचा हात हातात घेऊन सारे काही ठीक असल्याचे सांगितले आणि ३६० डिग्री स्कॅन पूर्ण झाला आहे, असेही सांगितले. प्रॉडक्टव्यक्तीला हुशारी वाटू लागली आणि तो उठून बसला. त्याला वाटले, बराच वेळ झाला आहे, प्रत्यक्षात फक्त दोनेक तास झाले होते आणि त्या दोन तासांत काय काय झाले, हे त्याला आठवायचा प्रयत्न करूनही आठवत नव्हते. त्याला पाळीव चतुष्पादाच्या भेटीची ओढ लागली आणि म्हणून त्याने लगेच घराकडे जायची तयारी केली. व्यवस्थेने त्याला त्याच्या घराच्या फाटकापाशी सोडले तेव्हा थकवा गेला नसला, तरी कमी झाल्याचे त्याला जाणवले.

फाटक उघडण्याच्या आधीच पाळीव चतुष्पाद शेपटीचा

पंखा गरागरा फिरवत स्वागताला हजर झाला. उड्या मारून, आवाज करून आणि शेपटी फिरवून मित्रधनी परत आल्याचा आनंद त्याने साजरा केल्यामुळे छोट्या विश्वाला बातमी कळलीच. पाळीव चतुष्पादाचा आणि छोट्या विश्वाचा आनंद फार काळ टिकला नाही. फाटक उघडून आत आल्यावर मित्रधन्याने चतुष्पादाच्या डोक्यावर हात ठेवला खरा; पण हा दुसऱ्याच कोणाचा तरी हात आहे, असे चतुष्पादास वाटले.

हा मित्रधनीच आहे का?

आपला मित्रधनी?

त्याचा विचारगंध असा?

नाही नाही! हा आपल्या मित्रधन्याचा विचारगंध नाही. मित्रधन्याचा विचारगंध म्हणजे गंधाचा उत्सव! प्रकाशाचे बेट!! ऊर्जेचे कारंजे!!!

पाळीव चतुष्पादाने मित्रधन्याला आपादमस्तक न्याहाळले. रूप तेच, शरीरगंध तोच प्रेमळ; पण काही तरी बिनसलेले. हा कोणता तरी दुसराच विचारगंध आहे. आपल्या मित्रधन्याचा नेहमीचा विचारगंध नाही. चतुष्पादाने मित्रधन्याच्या नजरेला नजर भिडवून त्याला काही तरी खटकते आहे, ते सांगायला सुरुवात केली. हे काय? मित्रधन्याचे डोळे असे निस्तेज का? कुठे गेली ती चमक?

**चतुष्पाद गोंधळला.**

**काही तरी बिनसलंय.**

**काही तरी बिघडलंय.**

**काही तरी गमावलंय.**

चतुष्पादाची अस्वस्थता त्याच्या मेंदूत मावेनाशी झाली. भुंकून भुंकून त्याने साऱ्या छोट्या विश्वाला आपली अस्वस्थता जाहीर करून टाकली. सजीव-निर्जीव सारेच गोंधळले. मित्रधन्याला काय झाले, हे कळेना. मित्रधनी चतुष्पादाला गोंजारत वेगवेगळ्या नावांनी त्याला पुकारू लागला. काही तरी बिनसले होतेच.

चतुष्पाद मित्रधन्याबरोबर घरात गेला. तुझा विचारगंध पूर्वीसारखा नाही – काही तरी विचित्र आहे, हे तो पुनः पुन्हा मित्रधन्याला सांगत राहिला, कंठाला शोष पडेपर्यंत! त्याच्या सततच्या भुंकण्याने मित्रधनी त्रासल्यासारखा झाला. चतुष्पादाला त्याने बाहेर जाण्यास फर्मावले. आपली नाराजी पुनःपुन्हा व्यक्त करत चतुष्पाद बाहेर आला. छोट्या विश्वातल्या साऱ्यांना आपली व्यथा पुनःपुन्हा सांगत राहिला.

छोट्या विश्वातले सारेच सजीव-निर्जीव आपल्या खेळकर नायकाची अवस्था पाहून गोंधळले. त्याच्या संतापात सामील झाले. अस्वस्थतेची लाट हळू-हळू ओसरू लागली. चतुष्पादाच्या संतापाची जागा विषादाने घेतली. आपल्याच नाही, तर मित्रधन्याच्याही नियंत्रणापलीकडचे काही तरी घडले आहे, हे चतुष्पादाच्या लक्षात येऊ लागले. मित्रधन्याकडे पाहून त्याला आता कणव वाटू लागली. प्रेमाने त्याचे मन भरून गेले. ऋणानुबंधाच्या घट्ट गाठी प्रत्यय देऊ लागल्या.

प्रॉडक्टव्यक्तीला मात्र यापैकी कशाचाच पत्ता नव्हता. थकवा गेला होता; पण तरी उत्साह वाटत नव्हता. थोडे लिखाण केले तर बरे वाटेल असे वाटल्याने त्याने कागद पुढे ओढला. लेखणी हातात घेतली आणि लिहिण्यास सुरुवात केली–

'शिक्षणपद्धतीमध्ये महाचतुरांनी आणलेल्या सुधारणा आपला अडपसडप देश बलशाली होण्यासाठी आवश्यकच आहेत. केवळ शिक्षणपद्धतीच नव्हे, तर सर्वच क्षेत्रांत महाचतुरांनी केलेला विचार आणि घडवत असलेले बदल अडपसडप देशाच्या हिताचे आहेत. आपल्या अडपसडप देशाला लाभलेल्या आतापर्यंतच्या नेतृत्वांपैकी महाचतुर ह्यांचे नेतृत्व सर्वात दूरदृष्टीचे आणि राष्ट्रहिताचे आहे.'

प्रॉडक्टव्यक्तीच्या लेखणीतून झरझर शब्द कागदावर उतरत होते. त्याच्या देहातील धमन्यांमधून जणू उसळणाऱ्या लाल द्रवाऐवजी थंडगार पिवळा द्रव वाहू लागला. एरवीच्या प्रॉडक्टव्यक्तीच्या लिखाणातले उकळते शब्द जणू थंडगार दगडाप्रमाणे कागदाला चिकटून स्तब्ध पडून राहिले.

चतुष्पादाच्या घ्राणेंद्रियात हा विचारगंध रुतू लागला, बोचू लागला. मित्रधन्यातल्या ह्या बदलाकडे चतुष्पाद असहायपणे बघत राहिला.

*डॉ. किरण कुलकर्णी हे भारतीय प्रशासकीय सेवेतले उच्चविद्याविभूषित ज्येष्ठ अधिकारी तर आहेतच; पण ते एक प्रगल्भ, संवेदनशील, बहुआयामी, व्यासंगी, प्रयोगशील व्यक्तिमत्त्व आहे. विचारांच्या ऊर्जेवर जगणारा एक बुद्धिमान, प्रामाणिक, कणखर, तत्त्वनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ अधिकारी. सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून कार्यरत. वर्षानुवर्षे प्रशासनात तटस्थ वृत्तीनं काम करणारा जबाबदार अधिकारी. शिस्तबद्ध कार्यशैली अमलात आणणारे, वैचारिक बैठक लाभलेले कुशल प्रशासक, मनस्वी लेखक, संशोधक वृत्ती, अभ्यासपूर्ण व ओघवत्या वक्तृत्वासाठी प्रसिद्ध. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात अग्रेसर व प्रेरणादायी मार्गदर्शक म्हणून सर्वश्रुत.*

**('अनामिकाची विचारधून' या कादंबरीची आगाऊ नोंदणी करणाऱ्या वाचकांना पुस्तकाच्या मूळ किमतीत ३० टक्के सवलत दिली जाईल. प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी संपर्क क्रमांक प्रशांत शिंदे : ९६१९५९४९३९, ८३६९२९६५९६)**